PAGE NO.:

DATE: / /

कारखाना स्थान निवडीशी संबंधित असणारे घटक

अ) प्राथमिक घटक व दुय्यम / सहायक घटक

अ) प्राथमिक घटक - (1) कच्च्या मालाची उपलब्धता -

उत्पादित मालामध्ये कच्च्या मालाचे प्रमाण हे सर्वात जास्त महत्वाचे असते व त्यामुळे ज्या ठिकाणी कारखाना उभा करावयाचा असेल त्या ठिकाणी उत्पादनाला लागणारा माल पुरेशा प्रमाणात व नियमितपणे उपलब्ध होवू शकेल किंवा नाही हे पहावे लागते. कच्चा माल कमी किमतीचा पण उत्पादित मालापेक्षा वजनाने फार जड असेल, तर वाहतुक खर्च कमी राहण्यासाठी कच्च्या मालाच्या जवळपास कारखाना स्थापन करणे सोईचे ठरते.

स्थान निवडीचा विचार करताना उत्पादनाच्या एकुण किमतीशी कच्च्या मालाच्या किमतीचे प्रमाण जर जास्त असेल तर कच्च्या मालाच्या सान्निध्यात कारखाने स्थापन करावे. हे मार्गदर्शक तत्व म्हणुन उपयोग करावा.

2. कर्मचारी वर्ग -

कर्मचारी वर्गामध्ये कुशल व अकुशल अशा दोन्ही प्रकारच्या कर्मचाऱ्यांचा समावेश होतो. उत्पादनाच्या एकुण किमतीत वेतन खर्चाचेहि प्रमाण जास्त असते. यामुळे कारखान्याचे स्थान निवडताना कारखान्यास आवश्यक तो कर्मचारी वर्ग सातत्याने व कमी खर्चात उपलब्ध होवू शकेल किंवा नाही याचा विचार केला जातो. हा प्रश्न सर्वसाधारणपणे अकुशल कामगारांच्या बाबतीत निर्माण होत नाही. कारण अशा प्रकारचे कामगार जवळजवळ सर्वत्र उपलब्ध असतात. पण कुशल कामगार सर्वत्र उपलब्ध असत नाहीत. त्यामुळे ज्या कारखान्यात कुशल, अर्ध-कुशल कामगार मोठ्या प्रमाणावर लागतात असे कारखाने या प्रकारचे कामगार जेथे उपलब्ध असतील त्याठिकाणी स्थापावे लागतात. तरी कामगारांना वेगवेगळी प्रलोभने दाखवुन दुसऱ्या ठिकाणी आकर्षित करुन घेणे शक्य असते. तसेच प्रशिक्षण देवुन कुशल करता येते. पण ही पध्दत वेळ खाणारी व खर्चिक असल्याने उत्पादन खर्चात वाढ होते

PAGE NO.:
DATE: / /

3. शक्ती व इंधनपुरवठा

कारखाना स्थान निवडीवर शक्ती व इंधनपुरवठा या घटकांचाही परिणाम होतो. दगडी कोळसा, पेट्रोल, डिझेल, रॉकेल व अन्य खनिज तेले, वीज, पाणी इत्यादी वस्तुंचा शक्तिसाधनांत समावेश होतो. पुर्वीच्या काळी कोळसा हेच मुख्यत्वे शक्तिसाधन म्हणुन वापरता जात होता. परंतु दगडी कोळसा वजनाला फार जड असतो. यामुळे दगडी कोळशाच्या खाणीपासुन कारखाना दुरवर स्थापन केल्यास कोळसा वेळेवर मिळेल याची खात्री नाही. व वाहतुकीचा खर्च जास्त येतो. परंतु आता जलविद्युतनिर्मिती मोठ्या प्रमाणावर होवू लागली असुन तिचा शक्तिसाधन म्हणुन सर्व उद्योगांत वापर करणे शक्य झाल्याने कारखान्याच्या स्थान निवडीमध्ये शक्तिसाधनाच्या सान्निध्याचा प्रश्न राहिलेला नाही वीज कितीही दुर नेता येते व फार स्वस्त पडते.

4. वाहतुक व दळणवळण सोई.

कारखान्यास कच्चा माल वेळच्यावेळी मिळण्यासाठी व कारखान्याने उत्पादित केलेला माल बाजारपेठेत नेण्यासाठी जलद व पुरेशी वाहतुक सेवा उपलब्ध असली पाहिजे. कारखान्याचे जीवित हे वाहतुकीवर अवलंबुन असते. चांगल्या वाहतुकीमुळे कारखान्याच्या कामाचा प्रवाह संथ व अखंडित राहु शकतो. कच्च्या मालात फार भांडवल गुंतवणुक करावी लागत नाही; माल संग्रहणाचा खर्च कमी येतो; उत्पादित वस्तुचे साठे पडुन राहत नाहीत.

वाहतुकीइतकेच दळणवळणाच्या साधनांची सोय असणे महत्वाचे असते. कारखान्याच्या व्यवस्थापकांना अनेक प्रकारची माहिती सत्वर उपलब्ध होणे आवश्यक असते. कारण या माहितीच्या आधारेच त्यांना महत्वाचे निर्णय घ्यावयाचे असतात. व्यवस्थापकांच्या अचुक व सत्वर निर्णयावरच उद्योग घटकाचे यश अवलंबुन असते.

5. बाजारपेठांचे सान्निध्य

उद्योग घटकाची जागा निश्चित करण्यामध्ये बाजारपेठेचा विचार महत्वाचा ठरतो. पक्क्या मालात रुपांतर करताना कच्च्या मालाच्या वजनात घट होत नसेल, तर उद्योग घटकाची स्थापना कच्च्या मालाच्या क्षेत्राच्या जवळपास न करता बाजारपेठांच्या जवळपास केली जाते. उदा. कापुस स्वच्छ करणे, त्यातील सरकी काढुन टाकणे व कापसाच्या

PAGE NO.:
DATE: / /

गाठी बांधणे या प्रक्रियांत कापसाचे वजन घटत असल्याने यांचे कारखाने कापुस उत्पादनाच्या जवळपास असतात. तर सुत गिरण्या व कापड गिरण्या यांच्या उत्पादनात वजन घटण्याचा प्रश्न नसल्याने या गिरण्या बाजारपेठांच्या शेजारी असतात.

ब) दुय्यम किंवा सहायक घटक-

1. बँकिंग व पत सुविधा.-

उद्योग घटकांचे कार्य अविरत चालण्यासाठी खेळत्या भांडवलाच्या गरजा भागविण्यासाठी बँकिंग व पत सुविधा उपलब्ध असणे गरजेचे असते. उद्योगांच्या बाबतीत बँका व इतर वित्तीय संस्था फार महत्वाची भूमिका बजावतात. व या उद्योगांच्या आर्थिक गरजा भागविण्यामध्ये मोलाची कामगिरी बजावतात.

2. नैसर्गिक किंवा भौगोलिक परिस्थिती-

कारखान्याची स्थाननिश्चिती करताना जमिनीचा स्तर, हवामान, डोंगराळ अथवा खडकाळ भाग इत्यादी बाबींचा विचार करावा लागतो. विशिष्ट मालाच्या उत्पादनासाठी विशिष्ट हवामान, जमिनीचा विशिष्ट प्रकार असावा लागतो.
उदा. कापसाच्या लांब धागा बनविण्यासाठी दमट हवेची गरज असते. यामुळे सुतगिरण्या समुद्रकिनाऱ्यालगत स्थापन झाल्याचे दिसुन येते. त्याचप्रमाणे जमिनीचा स्तरही विचारात घ्यावा लागतो. सुपीक जमीनीलगत शेतीशी संबंधित असणारे कारखाने स्थापन केले जातात.

नैसर्गिक परिस्थितीचाही विचार करणे गरजेचे आहे. पाणीपुरवठा, सांडपाण्याचा निचरा करण्याची सोय, उत्पादन प्रक्रियेतुन निर्माण होणारे टाकाऊ पदार्थ व त्यांची विल्हेवाट लावण्याची सोय इत्यादीसाठी आवश्यक अनुकुल परिस्थिती पाहिजे.

3. यंत्रसामग्रीच्या दुरुस्तीच्या सोई.-

उद्योग घटकाचे कार्य अखंडित चालु राहणे गरजेचे असते. जर उत्पादन कार्यात काही तासांचा खंड पडला तरी हजारो रुपयांचे नुकसान होते. यामुळे यंत्रसामग्रीत किंवा इतर उपकरणात बिघाड झाल्यास त्यांची सत्वर दुरुस्ती होणे आवश्यक असते. मोठे उद्योग घटक स्वतःचीच दुरुस्ती यंत्रणा निर्माण करु शकतात. पण लहान उद्योग घटकांना ते शक्य असत नाही.

PAGE NO.:
DATE : / /

४ सरकारी धोरण व कायदे -
देशातील सर्व भागांचा समतोल विकास व्हावा, शहरातील गर्दी कमी व्हावी या दृष्टीने कोणत्या भागात, कोणत्या वस्तु, किती प्रमाणात उत्पादित करावयाच्या, त्यांचे वितरण कसे करावयाचे इत्यादी संबंधात सरकार कायदेकानुन करीत असते, काही आर्थिक व इतर सवलती देत असते.

5 सहायक व पुरक उद्योग -
काही ठिकाणी काही कारणांमुळे काही ठराविक प्रकारचे उद्योग स्थापन झालेले असतात. यामुळे तशाच प्रकारचे किंवा त्यांना आनुषंगिक, साहाय्यभूत ठरणारे उद्योग त्या ठिकाणी स्थापन करणे फायदेशिर ठरते. कारण पुर्वीच्या उद्योगामुळे त्या ठिकाणी त्या क्षेत्रातील कुशल, कार्यक्षम कर्मचारी, वाहतुक सेवा, बँकिंग व पतसेवा, दळणवळणाच्या सोई उपलब्ध असतात.

6. लोकांच्या आवडीनिवडी -
उद्योगाची एखाद्या ठिकाणी स्थापना करण्यापूर्वी त्या प्रदेशातील लोकांच्या सवयी, आवडी निवडी, पसंती यांचा विचार करणे जरुरीचे असते. लोकांची क्रयशक्ती, जातीजमातींचे मिश्रण याचाही अभ्यास करावा लागतो.

७. स्पर्धात्मक उद्योग
मर्यादित व निरोगी स्पर्धा असेल तर उद्योगवाढीस चालना मिळते. पण हीच गळेकापू स्पर्धा असेल तर उद्योगाच्या वाढीस अडथळा होतो. व नविन उद्योग घटकांना अशा स्पर्धेला तोंड द्यावे लागते व ते त्याच्या कुवतीबाहेर असते.